मंगळवार
२१
सप्टेंबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २३५
पाने - ६
किंमत - ४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




महात्मा ज्योतिराव फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना
या योजना अंतर्गत
येणाऱ्या सर्व आजारांवर मोफत उपचार
व शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध




CARDIAC CONSULTATION | ECG | 2D ECHO

वरील 3 टेस्ट फक्त
~~₹3000/-~~ ₹ 700/- मध्ये

TMT TEST

वरील 4 टेस्ट फक्त
~~₹4200/-~~ ₹ 1200/- मध्ये

**उपलब्ध सुविधा**

- कन्सलटेशन
- ई.सी.जी.
- 2 डी इको-कार्डिओग्राफी
- स्ट्रेस टेस्ट
- होल्टर मॉनिटरींग
- ॲब्युलेटरी बी.पी. मॉनिटरींग
- ॲडव्हान्स कॅथलॅब
- C मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
- **फ्री ॲंजिओग्राफी आणि ॲंजिओप्लास्टी**
- पेसमेकर
- बलून वॉल्व्होटॉमी
- डिव्हाईस क्लोजर
- आय.व्ही.सी. फिल्टर
- आय.सी.यु. / अपघात विभाग
- व्हेंटीलेटर (कृत्रिम श्वासोच्छवास)
- मेडीकल व लॅब, डिजीटल एक्स-रे सुविधा



**जटील व दुर्मिळ प्रक्रिया**

- सी.टी.ओ. ॲंजिओप्लास्टी
- बायफरकेशन ॲंजिओप्लास्टी
- लेफ्ट मेन ॲंजिओप्लास्टी
- रेट्रोग्रेड ॲंजिओप्लास्टी
- व्हॉल्व्ह बदलण्याची शस्त्रक्रिया
- मुतखड्यावर दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- रोटा व आय.व्ही.यु.एस. मार्गदर्शित
- जटील ॲंजिओप्लास्टी

**सुपर स्पेशालिटी**

- सी.व्ही.टी.एस. सर्जरी
- एम.आय.सी.एस. सर्जरी
- प्लास्टिक सर्जरी, न्युरोसर्जरी
- जनरल सर्जरी
- न्युरोलॉजी, युरोलॉजी
- स्पाईन सर्जरी, जॉईंट रिप्लेसमेंट
- जनरल मेडीसीन

# दिघे हॉस्पिटल मल्टिस्पेशालिटी सेंटर

स्थळ : नाशिक पुणे हायवे, संगमनेर कॉलेज समोर,
ऐश्वर्या पेट्रोल पंप शेजारी, संगमनेर, जि. अहिल्यानगर

नाव नोंदणीसाठी संपर्क : (02425) 271777



डॉ. सुनिल दत्तात्रय दिघे
PULMONOLOGIST AND
INTERVENTIONAL CARDIOLOGIST (हृदयरोग तज्ञ)
MBBS, MD, (Sion Hospital, Mumbai) DNB (Delhi),
DM (J. J. Hospital, Mumbai)
FACC (fello.of American college of cardiology)

# पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्या - ना. विखे



अहिल्यानगर- दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ऑगस्ट २०२७ पर्यंत नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन आवश्यक पाणी आरक्षित ठेवावे. त्यानंतर उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे शेतीसाठी काटेकोर व सूक्ष्म नियोजन करावे. पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज असून पाणी संवर्धनासाठी प्रशासनासह नागरिकांनीही एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. नागरिकांना नियमितपणे पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राहुरी तालुका टंचाई आढावा बैठक पांडुरंग लॉन्स येथे झाली. यावेळी आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार अक्षय कर्डिले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, सध्याची परिस्थिती लक्षात घेता अधिकाऱ्यांनी अधिक संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करावे. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य देण्यात यावे. कामात हयगय आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. वीज वितरण विभागाने वीजपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. ग्रामसेवक तसेच तलाठी यांनी बैठकीत शेतकऱ्यांकडून मांडण्यात आलेल्या सूचना व अडचणींची तातडीने दखल घेऊन त्यावर कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले. निळवंडे तसेच मुळा धरणातील उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येणार असल्याचे सांगून पालकमंत्री म्हणाले की, पाणी सोडल्यानंतर त्याची गळती होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. मुळा धरणातील गाळ काढण्याबाबतही लवकरच कार्यवाही करण्यात येईल. कॅनॉल कमांड एरियामध्ये चारा लागवडीसाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी तालुक्यातील जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी अखंडित वीजपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी त्यांनी केली.

आमदार अक्षय कर्डिले यांनी तालुक्यात सरसकट शेतीचे पंचनामे करण्याची मागणी केली. पाणीपुरवठा योजनांना सौरऊर्जा पॅनेल बसविल्यास विजेची बचत होण्यास मदत होईल, यासाठी उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाबाबत आवश्यक कार्यवाही करावी तसेच उपसा जलसिंचन योजनांमध्ये विविध गावांचा समावेश करून शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

# नगराध्यक्षा नाईकवाडी गटाचे अकोले नगरपंचायतमध्ये वर्चस्व

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : नगरपंचायतीच्या विषय समिती सभापतीपदाच्या निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी यांच्या गटाने युतीचे वर्चस्व कायम राखत विषय समित्यांवर आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणले आहेत.



बुधवारी जिल्हाधिकारी यांनी जारी केलेल्या नोटीसनुसार पीठासीन अधिकारी अरुण उंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत या निवडी करण्यात आल्या. यावेळी नगराध्यक्ष सोनाली नाईकवाडी, उपनगराध्यक्ष शरद् नवले, मुख्याधिकारी धनश्री पवार, नगरसेवक बाळासाहेब वडजे, नवनाथ शेटे, कविता शेळके, माधुरी शेणकर, तमन्ना शेख, अनाबाई मोहिते, विमल मंडलिक आरिफ शेख वैष्णवी धुमाळ, शीतल बिबवे यांसह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

भाजपचे हितेश कुंभार यांची सार्वजनिक बांधकाम समिती, सागर चौधरी यांची पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती तर प्रतिभा मनकर यांची आरोग्य, स्वच्छता व वैद्यकीय समिती सभापतीपदी निवड झाली. तसेच अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या श्वेताली रुपवते यांना महिला व बालकल्याण सभापतीपदाची संधी मिळाली आहे.

तर पिचड गटाचे विद्यमान उपनगराध्यक्ष शरद नवले यांच्याकडे नियमानुसार नियोजन व विकास समितीचे सभापतीपद देण्यात आले आहे. निवडीपूर्वी नगराध्यक्ष नाईकवाडी यांच्यासोबतच्या ११ नगरसेवकांमध्ये विषय समितीसाठी इच्छुकांमध्ये मोठी चुरस होती. मात्र पंचवार्षिक निवडणुकीसाठी उर्वरित चार महिन्यांचा कालावधी लक्षात घेऊन समन्वय साधत बिनविरोध निवड प्रक्रिया पार पडली.

# श्री संगम ग्रामीण सह. पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## ९ कोटींच्या ठेवींसह संस्थेला १३ लाखांचा नफा; १२ टक्के लाभांश जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री संगम ग्रामीण











बिगर शेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संस्थेचे चेअरमन किसन भाऊ हासे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीसह आगामी वाटचालीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षपदासाठी किसन भाऊ हासे यांच्या नावाची सूचना संचालक श्री. शांताराम घुले यांनी मांडली, तर श्री. बळीराम बिल्लाडे यांनी अनुमोदन दिले. विषयपत्रिकेवरील सर्व विषयांचे वाचन करून त्यावर सभासदांमध्ये चर्चा करण्यात आली. संस्थेची आर्थिक पत्रके, आर्थिक वर्षाचा अहवाल तसेच अंदाजपत्रक यांचे वाचन करून सभासदांनी विविध विचारले त्यास यथोचित उत्तरे देण्यात आली. मागील सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन व्यवस्थापक रावसाहेब हासे यांनी केले. अहवालातील काही व्यवहारांच्या संदर्भात ॲड. के. एल. हासे यांनी चर्चा करून सभासदांना अधिक लाभांश मिळावा आणि डिव्हिडंडमध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी केली. यावर आगामी काळातील संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा विचार करून सभासदांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांचा निश्चितपणे विचार केला जाईल, अशी ग्वाही अध्यक्ष किसन भाऊ हासे यांनी दिली. सभेदरम्यान सभासदांनी संस्थेच्या कामकाजासंदर्भात विविध प्रश्न विचारून व्यवस्थापनाकडून माहिती घेतली. तसेच संस्थेची आर्थिक स्थिती अधिक मजबूत करण्यासाठी आणि भविष्यातील वाटचाल गतिमान करण्यासाठी काही नवीन संकल्पना व सूचना मांडल्या. या प्रश्नांना अध्यक्ष किसन भाऊ हासे, संचालक अनिल रहाणे, ॲड. सुभाष गोडगे, प्रदीप करपे आणि बळीराम बिल्लाडे यांनी यथोचित उत्तरे दिली. सभेचे अध्यक्ष किसन भाऊ हासे यांनी अध्यक्ष भाषण सर्वांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि यापुढेही काळात असे सहकार्य मिळावे अशी अपेक्षा केली. आभार प्रदर्शन आणि सभेची सांगता करण्यात आली.

# कै. रेवन्नाथ गवराम मोरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## निस्वार्थ सेवेला समर्पित जीवनाचा अंत



प्रतिकूल परिस्थितीवर जिद्द, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या बळावर मात करीत स्वतःचे जीवन घडविणारे, शासकीय सेवेत कर्तव्यनिष्ठेचा आदर्श निर्माण करणारे तसेच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि ग्रामविकासाच्या कार्यात सदैव पुढाकार घेणारे कै. रेवन्नाथ गवराम मोरे यांच्या निधनाने ढोकरी व पंचक्रोशी परिसराने एक कर्तव्यदक्ष, निस्वार्थी आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांचे रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीस मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

कै. रेवन्नाथ मोरे यांचा जन्म १९५७ साली ढोकरी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई गवराम मोरे, तर वडिलांचे नाव गवराम दगडू मोरे होते. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांचे बालपण आणि शिक्षण झाले. मात्र परिस्थितीपुढे हार न मानता त्यांनी जिद्दीने शिक्षण पूर्ण केले. मॉडर्न हायस्कूल, अकोले येथे त्यांचे शिक्षण झाले. जीवनात काहीतरी करून दाखवायचे, स्वतःच्या पायावर उभे राहायचे आणि कुटुंबाला आधार द्यायचा,या ध्येयाने त्यांनी नोकरी मिळविण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या संघर्षाला अखेर यश मिळाले आणि त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी मिळाली.

शासकीय सेवेत प्रवेश केल्यानंतर नोकरीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता त्यांनी ती एक जबाबदारी म्हणून स्वीकारली. प्रामाणिकपणा, शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि निस्वार्थ भावनेने त्यांनी आपली प्रदीर्घ शासकीय सेवा बजावली. सार्वजनिक बांधकाम विभागातील आपल्या कार्यकाळात त्यांनी अनेक कामे जबाबदारीने पूर्ण केली. त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा प्रत्यय त्यांच्या नोकरीच्या शेवटच्या कालावधीतही आला.

अकोले ते शेरणखेल रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक, योग्य पद्धतीने आणि परिपूर्णपणे पूर्ण करून घेतले. या कामाची गुणवत्ता आणि त्यामागील त्यांची प्रामाणिक भूमिका आजही अकोले-शेरणखेल मार्गावरील ग्रामस्थांच्या स्मरणात आहे. कामात कोणतीही तडजोड न करता ते पूर्णत्वास नेण्याची त्यांची कार्यपद्धती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होती. त्यांच्या निस्वार्थ आणि निष्कलंक शासकीय सेवेची दखल घेत दि. ३० मे २०१७ रोजी अगस्ति मंदिर, अकोले येथे त्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात त्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचा जीवनपट उलगडत त्यांचा गौरव केला. हा गौरव त्यांच्या सेवाभावी कार्याची आणि प्रामाणिकतेची सार्वजनिक पावती होती.

शासकीय सेवेसोबतच कै. मोरे यांनी समाजाशी असलेले आपले नातेही जपले. टाकळी विविध कार्यकारी सेवा सोसायटीची दूध डेअरी तालुका पातळीवरून गावपातळीवर आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आणि या कार्यात आपला खारीचा वाटा उचलला. गावाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी स्थानिक पातळीवर संस्था सक्षम व्हाव्यात, यासाठी त्यांचा सातत्याने सकारात्मक दृष्टिकोन राहिला.

गावातील सांप्रदायिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कोणत्याही क्षेत्रात काम करताना त्यांनी वैयक्तिक स्वार्थापेक्षा समाजहिताला अधिक महत्त्व दिले. गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठीही त्यांनी विशेष योगदान दिले.

गावातील महादेव मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. स्वतःच्या खर्चातून तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने त्यांनी हा सप्ताह सुरू केला. धार्मिक उपक्रमाच्या माध्यमातून गावातील एकोपा, श्रद्धा आणि सामाजिक सलोखा वाढावा, हीच त्यामागची भावना होती. त्यामुळे त्यांचे धार्मिक कार्य हे केवळ एका कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता गावाच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरले. कुटुंबवत्सल व्यक्ती म्हणूनही कै. रेवन्नाथ मोरे यांचे व्यक्तिमत्त्व तितकेच मोठे होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, भावजई, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे. आपल्या कुटुंबाची जबाबदारी त्यांनी अत्यंत प्रेमाने, कर्तव्यभावनेने आणि समर्थपणे पार पाडली. संघर्षमय परिस्थितीतून स्वतः उभे राहताना त्यांनी आपल्या कुटुंबालाही आधार दिला आणि पुढील पिढीला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही त्यांची समाजाप्रती असलेली बांधिलकी कमी झाली नाही. 'आपण समाजाचे देणे लागतो' या भावनेतून त्यांनी आपली वाट व्यावसायिक क्षेत्राकडे वळविण्याचा प्रयत्न केला. मात्र काही कालावधीतच ते आजारी पडले. प्रकृतीशी झुंज देत असतानाच रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी समजताच ढोकरी व टाकळी तसेच अकोले पंचक्रोशीतील नागरिक, मित्र, सहकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हळहळ व्यक्त केली.

त्यांच्या अंत्यविधीस मोठा जनसमुदाय उपस्थित राहिला. त्यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा आदर करणाऱ्या अनेकांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

कै. रेवन्नाथ गवराम मोरे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देणाऱ्यांमध्ये आमदार डॉ. किरण लहामटे (अकोले विधानसभा मतदारसंघ), अमित भांगरे (संचालक, जिल्हा सरकारी बँक, अहिल्यानगर), शंकर गायकर (विश्व हिंदू परिषद), सुरेश गडाख (शेतकरी उद्योग समूह), विनोद हांडे, बाळासाहेब भांगरे, योगी केशवबाबा चौधरी, संदीप कोळी (पोलीस निरीक्षक, अकोले पोलीस स्टेशन), ॲड. दिवा पाटील, ॲड. राहुल झावरे (अहिल्यानगर वकील संघटना), शिवाजी येवले (गव्हमेंट कॉन्ट्रॅक्टर), बाबासाहेब दातखिळे (मंडळ अधिकारी, अकोले), महेशराव नवले (शिवसेना, अकोले तालुका), झायेद इनामदार (न्यायाधीश, संगमनेर), विश्वासराव आरोटे (महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ), ॲड. सुनील मोकळ (अध्यक्ष, नवी मुंबई कोर्ट वकील संघटना), ॲड. संदीप रामकर (उपाध्यक्ष, नवी मुंबई वकील संघटना), ॲड. निलेश पाटील (नवी मुंबई वकील संघटना), ॲड. धीरज जस्वाणानं (नवी मुंबई वकील संघटना), प्रशांत वाकचौरे (अभियंता, पाटबंधारे विभाग), गोविंद वर्पे (न्यायमूर्ती, शहापूर)ॲड. सुहास आहेर, (विश्वस्त शिर्डी देवस्थान), ॲड. मंगेश देशमुख (उच्चन्यायालय), ॲड. के. डी. धुमाळ, ॲड. करमासे साहेब (राहाता), ॲड. निखील वाकचौरे (अकोले) यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश होता.

कै. रेवन्नाथ मोरे यांचे जीवन म्हणजे 'अडचणी कितीही मोठ्या असल्या तरी जिद्द, प्रामाणिकपणा आणि कष्ट यांच्या जोरावर माणूस आपले आयुष्य घडवू शकतो', याचा प्रेरणादायी संदेश आहे. हलाखीच्या परिस्थितीतून सुरुवात करून त्यांनी शासकीय सेवेत स्थान मिळविले, कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य दिले, कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलली आणि निवृत्तीनंतरही समाजासाठी काहीतरी करण्याची धडपड कायम ठेवली. त्यांनी पदाचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी नव्हे, तर कामाच्या माध्यमातून समाजाला काहीतरी देण्यासाठी* केला. म्हणूनच त्यांची आठवण केवळ एका कुटुंबापुरती मर्यादित राहणार नाही. त्यांनी केलेले सामाजिक, धार्मिक आणि सार्वजनिक कार्य पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. माणूस शरीराने या जगातून निघून जातो; मात्र त्याने केलेली चांगली कामे, दिलेले मार्गदर्शन, जपलेली नाती आणि समाजासाठी केलेले योगदान त्याला कायम स्मरणात ठेवते. कै. रेवन्नाथ गवराम मोरे यांनी आपल्या आयुष्यात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि समाजसेवेचा जो आदर्श निर्माण केला, तो त्यांच्या पश्चातही जिवंत राहील. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि मोरे परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

**शब्दांकन- राणाराजवर्धन मोरे (नातू)**


भावपूर्ण श्रद्धांजली !

आता सहवास नसला तरी स्मृती सुगंध देत राहील
जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण
तुमची येत राहील.....!



कै. रेवन्नाथ (नाना) गवराम मोरे पा.
यांचा दशक्रिया विधी
मंगळवार दि. २९/०९/२०२६ रोजी सकाळी ८ वाजता होईल.
ठिकाण : टाकळी (प्रवरातिरी) ता. अकोले, जि. अ.नगर

• शोकाकूल •

गं.भा. सुमन रेवन्नाथ मोरे (पत्नी)
ॲड.महेश रेवन्नाथ मोरे (मुलगा)
श्री. रूपेश रेवन्नाथ मोरे (मुलगा)
सौ.रोहिणी ज्ञानेश्वर देवकर (मुलगी)
सौ.मोहिणी सागर चौधरी (मुलगी)
सौ.स्वाती मोहन गजे (मुलगी)
सौ.अपेक्षा महेश मोरे (सुन)
सौ.पुजा रूपेश मोरे (सुन)
गं.भा. ताराबाई रेवन्नाथ मोरे (पत्नी)
श्री.दगडू गवराम मोरे (भाऊ)
गं.भा.सत्यभामा हरिभाऊ मोरे (भावजई)
सौ.विठाबाई दगडू मोरे (भावजई)
श्री.सारंगधर हरिभाऊ मोरे (पुतणे)
श्री.जनार्दन हरिभाऊ मोरे (पुतणे)
श्री.उध्दव दगडू मोरे (पुतणे)
श्री.भानुदास दगडू मोरे (पुतणे)
श्री.प्रदिप दगडू मोरे (पुतणे)
ॲड.सौरभ सारंगधर मोरे (नातू)
चि.गौरव सारंगधर मोरे (नातू)
सौ.परिघा आनंदराव वाळुंज (पुतणी)
सौ.मथुरा सदाशिव अमराळे (पुतणी)
सौ.पुष्पा रमेश वाळके (पुतणी)
सौ.द्वारका नामदेव शेटे (पुतणी)
सौ.इंद्रायणी भरत वाकचौरे (पुतणी)

नातवंडे - आरती,गायत्री,ज्ञानेश्वरी,श्लोक,राणाराजवर्धन,श्रेयश,यशवर्धन,दुर्वा,आरूष,स्वानंदी,जिजा,रूणाली,राया

समस्त मोरे परिवार व नातेवाईक

टीप : ह.भ.प. अमोल महाराज भोत यांचे प्रवचन होईल.


शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# राज्यात दुष्काळ, सरकार डेटा सेंटरवर मेहेरबान

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात २६५ तालुक्यांमध्ये भीषण दुष्काळ जाहीर झालेला असताना आणि बळीराजा पाण्यासाठी टाहो फोडत असताना, राज्य सरकारच्या धोरणावरून काँग्रेसने सरकारला धारेवर धरले आहे. 'एकीकडे शेतकऱ्यांच्या वाट्याला दुष्काळ आणि दुसरीकडे डेटा सेंटर्सच्या वाट्याला मुबलक पाणी आणि वीज, हा कुठला विकास?' असा घणाघाती सवाल काँग्रेसने राज्य सरकारला विचारला आहे. काँग्रेसने आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून पोस्ट करत सरकारच्या धोरणांवर टीका केली आहे.

राज्यातील बहुतांश भाग सध्या पावसाअभावी होरपळून निघत आहे. पिके करपून गेली असून जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीवर बोट ठेवत काँग्रेसने म्हटले आहे की, महाराष्ट्रातील २६५ तालुके दुष्काळाच्या झळा सोसत आहेत. शेतकरी पाण्यासाठी टाहो फोडतोय. मात्र, त्याचवेळी राज्य सरकार डेटा सेंटर्सना अखंड वीज आणि अखंड पाणीपुरवठ्याची तरतूद करत आहे. महाराष्ट्राच्या डेटा सेंटर धोरणात या अखंड पाणी आणि वीजपुरवठ्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.

# विशाल आल्हाटची एमपीएससी परीक्षेत बाजी



अकोले (प्रतिनिधी):

अकोले तालुक्यातील कळस गावचा भूमिपुत्र विशाल प्रकाश आल्हाट याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे त्याचा मोठा भाऊ विक्रांत आल्हाट हादेखील नुकताच पोलीस उपनिरीक्षक पदावर रुजू झाला आहे. अत्यंत हलाखीच्या आणि प्रतिकूल परिस्थितीतून दोन्ही भावांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे कळस गावच्या मानात मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

दोन्ही भावांच्या या दैदिप्यमान यशाची नोंद घेत कळस ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे आणि जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे यांच्या शुभहस्ते विशाल आल्हाट व त्यांच्या पालकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

आल्हाट कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. वडील प्रकाश आल्हाट हे माध्यमिक शाळेत प्रयोगशाळा परिचर (लॅब अटेंडंट) म्हणून कार्यरत होते, तर आई मंदा आल्हाट या एसटी महामंडळाच्या अकोले आगारात वाहक (कंडक्टर) म्हणून सेवा बजावत आहेत. आई-वडिलांनी कष्ट उपसून मुलांच्या शिक्षणात कोणतीही तडजोड केली नाही. पालकांच्या याच कष्टाचे चीज करत दोन्ही भावांनी प्रशासकीय सेवेत उच्च पद मिळवून दाखवले.

विशाल याचे प्राथमिक शिक्षण कळस येथील प्राथमिक शाळेत झाले, तर माध्यमिक शिक्षण कळसेश्वर विद्यालयात पूर्ण झाले. गावातीलच शाळेत शिक्षणाचा पायंडा रचून त्याने एमपीएससीसारख्या कठीण परीक्षेत हे यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील मुलांसाठी विशाल आणि विक्रांत यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरत असून, सर्व स्तरांतून या आल्हाट बंधूंचे आणि त्यांच्या कष्टकरी पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले जात आहे.

# वृत्तपत्र विक्रीतील शांत, मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व हरपले

## प्रभाकर टकले यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शहरातील परिचित व प्रसिद्ध वृत्तपत्र विक्रेते प्रभाकर रंगनाथ टकले (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने शनिवारी (दि. २६) सकाळी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संगमनेर शहरातील वृत्तपत्र विक्री क्षेत्रातील एक शांत, प्रेमळ आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

प्रभाकर टकले हे गेल्या अनेक वर्षांपासून वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने करत होते. वृत्तपत्र हा केवळ व्यवसाय न मानता, वाचकांपर्यंत दररोज बातम्या पोहोचविण्याचे आपले कर्तव्य समजून त्यांनी सेवा केली. त्यांच्या शांत, संयमी आणि आपुलकीच्या स्वभावामुळे ग्राहक, वृत्तपत्र विक्रेते तसेच पत्रकारिता क्षेत्रातील अनेकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. विशेष म्हणजे, अगदी काही दिवसांपूर्वीपर्यंत ते नेहमीप्रमाणे आपल्या पेपर स्टॉलवर उपस्थित राहून ग्राहकांना वृत्तपत्रे देत होते. मात्र, अचानक प्रकृती खालावल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच शनिवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर संगमनेर येथील अमरधाममध्ये शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच संगमनेर शहरातील वृत्तपत्र विक्रेते, पत्रकार, वाचक आणि परिचितांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक बहीण, पत्नी, दोन मुले निखील आणि दिनेश, सुन व नातवंडे असा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. प्रभाकर रंगनाथ टकले यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# वेतन रखडल्याने वीज कंत्राटी कामगारांवर उपासमारीची वेळ

## अपघातग्रस्त कर्मचाऱ्यांच्या मदतीकडे दुर्लक्षाचा आरोप, अन्यथा आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महावितरणच्या संगमनेर विभागांतर्गत बाह्यस्त्रोत पद्धतीने कार्यरत असलेल्या वीज कंत्राटी कामगारांचे वेतन रखडल्याने आर्थिक संकट निर्माण झाले आहे. वेतनासोबतच पीएफ व ईएसआयसी योगदान भरण्यातही विलंब होत असून, अपघातग्रस्त कर्मचाऱ्याच्या मदतीसाठी संबंधित एजन्सीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.

संगमनेर विभागासाठी नेक्सस मल्टी सर्विसेस कॉर्पोरेशन, छत्रपती संभाजीनगर या एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. कामगारांच्या म्हणण्यानुसार, जुलै महिन्याचे वेतन सप्टेंबरमध्ये मिळाले, तर ऑगस्टचे वेतन २८ सप्टेंबरपर्यंतही मिळालेले नाही. त्यामुळे अल्प वेतनावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कामगारांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

दरम्यान, पीएफ व ईएसआयसी योगदानातही विलंब होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. तसेच १८ सप्टेंबर रोजी महावितरणचे काम करताना गंभीर अपघात झालेल्या कंत्राटी कर्मचारी वैभव देशमुख यांची संबंधित एजन्सीच्या प्रतिनिधीने अद्याप भेट घेतली नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.

या सर्व प्रकारामुळे कंत्राटी कामगारांमध्ये तीव्र नाराजी असून, वेतन, पीएफ-ईएसआयसी आणि अपघातग्रस्त कर्मचाऱ्याच्या प्रश्नांची तातडीने सोडवणूक न झाल्यास काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कामगारांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे. संबंधित एजन्सीच्या कारभाराची चौकशी करून कामगारांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे. कामगारांच्या म्हणण्यानुसार, जुलै २०२६ महिन्याचे वेतन सप्टेंबर २०२६ मध्ये अदा करण्यात आले. तसेच ऑगस्ट २०२६चे वेतन पुढील महिन्याच्या ७ तारखेपर्यंत अदा करणे अपेक्षित असतानाही सप्टेंबर महिन्याची २८ तारीख उलटूनही वेतन मिळालेले नसल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. अल्प वेतनावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन न मिळाल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, काही कामगारांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# जागतिक हृदय दिन विशेष

# हृदयाची काळजी घ्या, आनंदी आणि निरोगी जीवन जगा

## हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सुनील दत्तात्रय दिघे यांचा नागरिकांना आरोग्य संदेश



आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत हृदयाचे आरोग्य जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी बनली आहे. बदलती जीवनशैली, वाढता ताणतणाव, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि व्यसनाधीनता यामुळे हृदयरोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. जागतिक हृदय दिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने आपल्या हृदयाची काळजी घेण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे.

हृदय हे आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचे अवयव आहे. ते अखंडपणे रक्ताभिसरणाचे कार्य करून शरीरातील प्रत्येक पेशीला ऑक्सिजन आणि ऊर्जा पोहोचवते. त्यामुळे हृदय निरोगी ठेवण्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी आवश्यक आहे.

**हृदयविकाराची प्रमुख लक्षणे ओळखा**

हृदयाशी संबंधित समस्या वेळीच ओळखल्यास गंभीर धोका टाळता येतो. खालील लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

- **छातीत दुखणे, जडपणा किंवा दाब जाणवणे**
- **डाव्या हातात, खांद्यात, जबड्यात किंवा पाठीमध्ये वेदना जाणवणे**
- **अचानक दम लागणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे**
- **जास्त घाम येणे, चक्कर येणे किंवा अशक्तपणा जाणवणे**
- **हृदयाची धडधड वाढणे किंवा अनियमित होणे**
- **थोडे काम केल्यानंतरही जास्त थकवा जाणवणे**

अशा कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित वैद्यकीय तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे.

**हृदय निरोगी ठेवण्यासाठी घ्या ही काळजी -**

**१) नियमित व्यायाम करा**

दररोज किमान ३० मिनिटे चालणे, योगासने किंवा हलका व्यायाम केल्याने हृदयाची कार्यक्षमता वाढते.

**२) संतुलित आहार घ्या**

फळे, हिरव्या भाज्या, कडधान्ये, कमी तेलाचा आहार यांचा समावेश करा. जास्त मीठ, तेलकट पदार्थ, फास्ट फूड आणि साखरेचे प्रमाण कमी करा.

**३) तणावावर नियंत्रण ठेवा**

अतिताण हृदयासाठी घातक ठरू शकतो. ध्यान, योग, सकारात्मक विचार आणि पुरेशी झोप यामुळे मानसिक आरोग्य चांगले राहते.

**४) व्यसनांपासून दूर राहा**

धूम्रपान, तंबाखू आणि मद्यपान यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

**५) नियमित आरोग्य तपासणी करा**

रक्तदाब, मधुमेह, कोलेस्ट्रॉल यांची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे. विशेषतः ४० वर्षांनंतर हृदयाची तपासणी करून घेणे फायदेशीर ठरते.

**हृदयविकारावर आधुनिक उपचार उपलब्ध**

आजच्या आधुनिक वैद्यकीय क्षेत्रात हृदयविकारासाठी अत्याधुनिक तपासण्या व उपचार उपलब्ध आहेत. ECG, 2D Echo, TMT Test, कार्डियाक कन्सल्टेशन अशा तपासण्यांद्वारे हृदयाची स्थिती समजण्यास मदत होते. वेळेत निदान झाल्यास योग्य उपचार करून रुग्णाचे आयुष्य सुरक्षित करता येते.

व नागरिकांना आवाहन

हृदयविकार हा अचानक येणारा आजार नसून अनेकदा तो आपल्या चुकीच्या जीवनशैलीचा परिणाम असतो. त्यामुळे आजपासूनच हृदयाची काळजी हा दृष्टिकोन प्रत्येकाने स्वीकारला पाहिजे. निरोगी हृदय म्हणजे निरोगी कुटुंब आणि आनंदी जीवन.

जागतिक हृदय दिनानिमित्त प्रत्येकाने एक संकल्प करूया -

नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि वेळेवर तपासणी करून आपल्या हृदयाचे रक्षण करूया.

**डॉ. सुनील दत्तात्रय दिघे**
MBBS, MD, DNB (Delhi), DM (J.J. Hospital, Mumbai)
इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट व हृदयरोग तज्ज्ञ
दिघे हॉस्पिटल मल्टिस्पेशालिटी सेंटर, संगमनेर

# औषधोपचारात डॉक्टरांचा सल्ला महत्त्वाचा

## 'लाल तारा मेडिकल'कडून आरोग्य जनजागृतीचा उपक्रम



संगमनेर - आरोग्य ही प्रत्येकाच्या जीवनातील सर्वात मोठी संपत्ती आहे. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आजारपणाच्या समस्या वाढत असताना योग्य औषधोपचार घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे. मात्र, अनेक वेळा नागरिक डॉक्टरांचा सल्ला न घेता स्वतःहून औषधे घेतात. ही सवय आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे कोणतेही औषध घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे, असा आरोग्य जनजागृतीचा संदेश लाल तारा मेडिकल, संगमनेर-अकोले वतीने दिला आहे.

आज अनेक नागरिक किरकोळ आजारांवर स्वतःच्या अनुभवातून, शेजारी-पाजारी किंवा मित्रांच्या सल्ल्यावरून औषधे घेतात. काही जण इंटरनेट, सोशल मीडिया किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित साधनांवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे स्वतःच आजार ओळखण्याचा आणि त्यावर औषधे घेण्याचा प्रयत्न करतात. मात्र, अशी माहिती ही वैद्यकीय तपासणी आणि डॉक्टरांच्या निदानाची जागा घेऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीची प्रकृती, वय, वजन, आधीपासून असलेले आजार, सुरू असलेली औषधे आणि ॲलर्जी वेगवेगळी असते. त्यामुळे एका व्यक्तीला उपयुक्त ठरणारे औषध दुसऱ्या व्यक्तीसाठी घातक ठरू शकते. स्वतःहून औषधे घेण्याची सवय अनेकदा गंभीर दुष्परिणामांना कारणीभूत ठरते. चुकीचे औषध, चुकीचा डोस किंवा अपूर्ण उपचार यामुळे आजार वाढू शकतो, उपचारास उशीर होऊ शकतो किंवा शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतात. विशेषतः अँटिबायोटिक्स, स्टेरॉइड्स, मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग आणि इतर दीर्घकालीन आजारांची औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय सुरू करणे, बंद करणे किंवा त्यांचा डोस बदलणे अत्यंत धोकादायक आहे. अँटिबायोटिक्सचा अयोग्य वापर केल्यास भविष्यात औषधांचा परिणाम कमी होण्यासारख्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.

तसेच, केवळ जास्त सवलत किंवा कमी किंमतीच्या मेडिकलमधूनच औषधे खरेदी करावीत. औषधांच्या बाबतीत गुणवत्ता, सुरक्षितता आणि विश्वासार्हता यांना किंमतीपेक्षा अधिक महत्त्व दिले पाहिजे. औषध विक्री हा केवळ व्यवसाय नसून समाजाप्रती असलेली एक महत्त्वाची आरोग्यसेवा आहे. प्रत्येक परवानाधारक मेडिकलमध्ये कार्यरत फार्मसिस्ट हा औषधशास्त्रातील प्रशिक्षित तज्ज्ञ असतो. त्यामुळे औषधे खरेदी करताना फार्मसिस्टकडून योग्य माहिती घेणे ही प्रत्येक रुग्णाची जबाबदारी आहे. रुग्णांनी औषध कसे घ्यायचे, किती डोस घ्यायचा, जेवणापूर्वी की नंतर घ्यायचे, किती दिवस उपचार सुरू ठेवायचे, औषधाची योग्य साठवणूक कशी करायची, संभाव्य दुष्परिणाम कोणते असू शकतात, इतर औषधांसोबत ते सुरक्षित आहे का, तसेच एखादा डोस चुकल्यास काय करावे याबाबत फार्मसिस्टचा सल्ला घ्यावा. योग्य माहितीमुळे औषधांचा सुरक्षित आणि प्रभावी वापर होण्यास मदत होते. डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घेतल्यास आजाराचे योग्य निदान होऊन प्रभावी उपचार मिळतात. त्याचबरोबर योग्य औषध, योग्य डोस, योग्य कालावधी आणि आवश्यक ती काळजी याबाबत स्पष्ट मार्गदर्शन मिळते. यामुळे उपचार अधिक परिणामकारक ठरतात आणि औषधांचे दुष्परिणाम किंवा चुकीच्या वापरामुळे होणारे धोके कमी होतात. लाल तारा मेडिकलच्या माध्यमातून नागरिकांना नेहमीच दर्जेदार औषधे, योग्य मार्गदर्शन आणि आरोग्यविषयक माहिती देण्याचा प्रयत्न केला जात आहे. रुग्णांचे आरोग्य सुरक्षित राहावे, औषधांचा योग्य वापर व्हावा आणि समाजात औषधांविषयी वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा हा या जनजागृती उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे सचिन आवारी आणि अमोल आवारी यांनी सांगितले. आरोग्याच्या बाबतीत निष्काळजीपणा न करता वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणे, नियमित तपासणी करणे, परवानाधारक मेडिकलमधूनच औषधे खरेदी करणे आणि फार्मसिस्टकडून औषधांची संपूर्ण माहिती जाणून घेणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. डॉक्टर, फार्मसिस्ट आणि रुग्ण यांच्यातील विश्वास, योग्य संवाद आणि सहकार्य यामुळेच सुरक्षित औषधोपचार आणि निरोगी समाजाची निर्मिती होऊ शकते. योग्य माहिती, योग्य औषध आणि योग्य मार्गदर्शन हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे.


लाल तारा®
मेडीकल शॉपी
- शाखा -
अकोले 9404050269 | संगमनेर 9142903000 | संगमनेर (गणेशनगर) 7218976111


हृदयाची काळजी घ्या आनंदी आणि निरोगी जीवन जगा...

# संपादकीय...

## दुष्काळ जाहीर झाला आता मदत कधी पोहोचणार?

दुष्काळाची घोषणा झाली आणि कागदावर शेतकऱ्याच्या संकटाला सरकारी मान्यता मिळाली. मात्र, सरकारच्या आदेशापासून शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचेपर्यंतचा प्रवास किती लांब असणार? हा खरा प्रश्न आहे. संगमनेर तालुक्यासह राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी आता घोषणा नव्हे, तर तातडीच्या कृतीची वेळ आली आहे. यंदाच्या पावसाने शेतकऱ्यांची मोठी निराशा केली. पावसात पडलेले प्रदीर्घ खंड, पिकांची झालेली दुरवस्था आणि उत्पादनात झालेली घट यामुळे खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून निसटला. अनेक ठिकाणी पिके वाळून गेली, तर काही ठिकाणी उत्पादन खर्चही निघण्याची शक्यता राहिलेली नाही. बियाणे, खते, औषधे, मजुरी यावर केलेला खर्च डोळ्यासमोर उभा असताना उत्पन्न मात्र शून्याच्या दिशेने जात आहे. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्त तालुका जाहीर होणे निश्चितच दिलासादायक पाऊल आहे; पण दुष्काळाची घोषणा ही मदतीची सुरुवात आहे, शेवट नाही. सरकारने दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी विविध सवलती जाहीर केल्या आहेत. महसुलात सवलत, कर्जवसुलीस स्थगिती किंवा पुनर्रचना, वीजबिलातील सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात सवलत, रोजगार हमीच्या कामांना चालना, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जनावरांसाठी चारा अशा उपाययोजना अपेक्षित आहेत. या सर्व घोषणा कागदावर सुंदर दिसतात; मात्र संकटात असलेल्या शेतकऱ्याला त्यांचा प्रत्यक्ष लाभ मिळाला तरच त्या घोषणांना अर्थ आहे. आज शेतकऱ्याला सर्वात आधी गरज आहे ती सरसकट आणि तातडीच्या पंचनाम्यांची. पाऊस कमी झाला, पिके वाळली आणि नुकसान झाले, यासाठी शेतकऱ्याने पुन्हा पुन्हा सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवणे योग्य नाही. महसूल विभाग, कृषी विभाग आणि ग्रामपातळीवरील यंत्रणेने प्रत्यक्ष शेतात जाऊन वस्तुनिष्ठ पाहणी करावी. पंचनाम्यांच्या प्रक्रियेत कोणताही शेतकरी वंचित राहू नये. कागदपत्रांची पूर्तता, तांत्रिक अडचणी किंवा प्रशासकीय विलंबाच्या नावाखाली मदत लांबणीवर पडू नये. दुष्काळ म्हणजे केवळ पिकांचे नुकसान नव्हे. त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. शेतकऱ्याचे उत्पन्न कमी झाले की बाजारपेठेतील उलाढाल कमी होते. कृषी सेवा केंद्रे, मजूर, वाहतूकदार, छोटे व्यापारी, दूध व्यवसाय आणि ग्रामीण भागातील अनेक घटकांवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे दुष्काळ निवारणाकडे केवळ कृषी विभागाचा विषय म्हणून पाहता येणार नाही. ही संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेची लढाई आहे. याचबरोबर पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने नियोजन करणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत उपलब्ध जलसाठ्याचे सूक्ष्म नियोजन झाले पाहिजे. टँकर सुरू करण्याची वेळ येईपर्यंत वाट पाहण्याऐवजी संभाव्य टंचाईग्रस्त गावांची यादी तयार करून पर्यायी स्रोत निश्चित केले पाहिजेत. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था वेळेवर झाली नाही, तर ग्रामीण भागातील संकट आणखी तीव्र होईल. वीजपुरवठ्याचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. दुष्काळात शेतकऱ्याला उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करण्यासाठी वीज आवश्यक आहे. कृषिपंपांचा वीजपुरवठा अनियमित असेल, तर उपलब्ध पाणीदेखील शेतापर्यंत पोहोचणार नाही. त्यामुळे वीज वितरण कंपनीने निश्चित वेळापत्रक जाहीर करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. दुष्काळाच्या काळात सर्वात मोठा धोका असतो तो कर्जाच्या ओझ्याचा. एका हंगामाचे नुकसान शेतकऱ्याला पुढील हंगामासाठी पुन्हा कर्ज घेण्यास भाग पाडते. त्यामुळे कर्जवसुलीस स्थगिती किंवा पुनर्रचना यासारख्या उपाययोजना तातडीने आणि सुलभ पद्धतीने लागू झाल्या पाहिजेत. बँकांनीही शेतकऱ्यांकडे केवळ थकबाकीदार म्हणून न पाहता संकटग्रस्त ग्राहक म्हणून पाहण्याची गरज आहे. दुष्काळ हा केवळ निसर्गाचा प्रश्न नाही; तो आपल्या जलव्यवस्थापनाच्या धोरणांचीही परीक्षा आहे. दरवर्षी पावसाचे अनिश्चित स्वरूप वाढत असताना जलसंधारण, शेततळी, बंधारे, गाळ काढणे, पाण्याचा पुनर्वापर आणि सूक्ष्म सिंचन यावर सातत्याने काम करावे लागेल. दुष्काळ आला की उपाययोजना आणि पाऊस आला की विस्मरण, हा चक्रव्यूह आता मोडावा लागेल. आज गरज आहे ती राजकीय श्रेयाची नव्हे, तर प्रशासनिक संवेदनशीलतेची. दुष्काळ जाहीर करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला, सरकारने निर्णय घेतला, हे स्वागतार्ह आहे. पण आता त्या निर्णयाची अंमलबजावणी कोणत्या वेगाने होते, यावर शेतकऱ्याचा विश्वास अवलंबून आहे. शेतकरी मदतीसाठी सरकारकडे हात पसरत नाही; त्याने गमावलेल्या श्रमाचा आणि उत्पादनाचा न्याय्य मोबदला मागितला आहे.

## सुरेंद्र देशमुख यांची उपजिल्हाधिकारीपदी बढती



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्याचे भूमिपुत्र तथा सुगाव येथील रहिवासी सुरेंद्र देशमुख यांची तहसीलदार पदावरून उपजिल्हाधिकारीपदी बढती झाल्याबद्दल त्यांचे अकोले तालुक्यातून अभिनंदन होत आहे. या बढतीनिमित्त टाहाकारीचे माजी सरपंच बाच्छव एखंडे व शमशेरपूर येथील सामाजिक कार्यकर्ते शांताराम दराडे यांनी सिन्नर येथे देशमुख यांचा बुके देऊन सत्कार केला.

यावेळी टाहाकारी येथील जगदंबा मातेच्या नवरात्रोत्सवानिमित्त दर्शन व आशीर्वाद घेण्यासाठी देशमुख यांना निमंत्रण देण्यात आले. उपजिल्हाधिकारी पदाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडून या पदाला योग्य न्याय देण्याचा निर्धार सुरेंद्र देशमुख यांनी व्यक्त केला. देशमुख यांचे प्राथमिक शिक्षण सुगाव येथील जिल्हा परिषद शाळेत झाले असून, अकोले तालुक्यातील भूमिपुत्राने प्रशासकीय सेवेत मिळविलेल्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## मालपाणी विद्यालयाच्या १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाचे विभागीय हँडबॉल स्पर्धेत यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर कॉलेजच्या क्रीडांगणावर संपन्न झालेल्या १४ व १७ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या हँडबॉल स्पर्धांमध्ये मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने जिल्हास्तरावर विजेतेपद पटकावून विभागीय स्पर्धेत उपविजेतेपद मिळवले, तर १४ वर्षे वयोगटातील मुला व मुलींच्या दोन्ही संघांनी जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवून उपविजेतेपद पटकावले आहे.

संगमनेर कॉलेज येथे आयोजित जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील मालपाणी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली होती. यानंतर झालेल्या विभागीय स्तरावरील अटीतटीच्या सामन्यांमध्ये उत्कृष्ट खेळ करत या संघाने उपविजेतेपदावर आपले नाव कोरले. तसेच, १४ वर्षे वयोगटातील मुलांचा आणि मुलींचा असे दोन्ही संघ जिल्हास्तरीय स्पर्धेत उपविजेते (द्वितीय क्रमांक) ठरले आहेत. या सर्व यशस्वी खेळाडूंना विद्यालयाच्या क्रीडाशिक्षिका तथा पर्यवेक्षिका रंजना पवार व सुनील आढळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सर्व संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे, मार्गदर्शक शिक्षकांचे तसेच पालकांचे विशेष अभिनंदन केले व पुढील क्रीडा प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

## भंडारदऱ्यावर निसर्गाची मुक्त उधळण !

### पर्यटकांना भूरळ घालणाऱ्या पाबरगडावर फुलांचा पुष्पोत्सव सुरू

छाया- विलास तुपे, राजूर



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- निसर्ग सौंदर्याची मुक्त उधळण असणाऱ्या व पर्यटकांना भुरळ घालणाऱ्या निसर्ग सौंदर्याचे वरदान लाभलेल्या भंडारदरा परिसरात वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वेगवेगळे अनोखे चमत्कार पर्यटकांना भुरळ पाडत आहेत

सप्टेंबरच्या शेवटच्या सप्ताहापासून ते नोव्हेंबरच्या पहिल्या सप्ताहापर्यंत पिवळ्या रंगाची सोनकी व खुरासनीची फुले घाटघर, रतनवाडी, भंडारदरा परिसरातील हिरव्यागार डोंगरदऱ्यात रानात पसरल्याने निसर्ग सौंदर्यात आणखीनच भर पडल्याने पर्यटकांना आकर्षित करू लागली आहे. पावसाचा जोर काहीसा कमी होतो. सगळीकडे पावसाने राज्य केल्यामुळे हिरवळीने सह्याद्रीची पर्वतरांग नटून बसली आहे. हिरवाकच दिसणाऱ्या या हिरवळरुपी शालीला आता रानफुले व गवत फुलांची झालर

बसविली असून, अनेक प्रकारची निसर्गाची देणं असलेली फुले कळसूबाईच्या शिखरावर तसेच भास होताना दिसत आहे. सोनकळीच्या फुलांनी संपूर्ण जंगलालाच सोन्याचा मुलामा चढविल्यागत भंडारदऱ्याच्या परिसरात अनेक प्रकारची गवत फुले व रानफुलेही उगवली असून निसर्गाचा हा अद्भुत असा देखावा पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करू लागले आहेत. तर आशिया खंडातील सर्वांत मोठी दरी समजल्या जाणाऱ्या सांदन दरीचा आनंद घेण्यासाठी आलेले शेकडो पर्यटक या फुलांची मनमोहक अदा आपल्या कॅमेऱ्यात टिपण्यासाठी

आतूर झाले आहेत. ज्या प्रकारे भंडारदऱ्याला पावसाअगोदरचा काजवा महोत्सव व पावसाळ्यातील जलोस्तवाला पर्यटकांची असंख्य पर्यटक भेट देतात, अशीच पर्यटकांची पसंती फुलोत्सवाला मिळाली, तर भंडारदरा महाराष्ट्रातील दुसरे कास पठार म्हणून ओळखला जाईल.


**Yuvavarta.in**

VISIT INSTAGRAM

**daily_yuvavarta**

VISIT Facebook

**Daily yuvavarta**

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL



**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME FARIDA AHEMAD SHAIKH

NEW NAME AS FARIDA AHAMAD SHAIKH

ADD - GANESH NAGAR SAMNAPUR TAL - SANGAMNER



**Jijamata English Medium School**

Pavbaki Road Sangamner, CBSE Affiliation No - 1131530

**VACANCIES**

| PARTICULARS | POST | QUALIFICATIONS |
|---|---|---|
| Pre Primary Teachers | 2 | H. Sc., D. T. Ed |
| PRIMARY AND SECONDARY | | |
| English, Marathi, Hindi | 1 | H. Sc., D. T. Ed / B.A. / M.A., B.Ed |
| Maths, EVS, Science | 1 | B.Sc./M.Sc. (Maths / Science) B.Ed. |
| Social Studies | 1 | B.A. / M.A., B.Ed (History & Geography) |
| IT Teacher | 1 | B.C.S. / M.C.S, B.C.A. / M.C.A. |
| Physical Director | 1 | B.A., B.P. Ed |
| Special Educator | 1 | B.A. / M.A., B.Ed. in Special Education or equivalent qualification |
| School Counsellor | 1 | B.A. / M.A. Clinical Psychology / Diploma/certificate in School Couselling |
| Dance Teacher | 1 | Diploma/ Degree in Fine Arts Performing Art or Related Field |
| Music Teacher | 1 | Sangeet Visharad Proficiency in singing & teaching musical instruments |
| Art and Craft Teacher | 1 | A.T.D.C.T.C (Minimum 2 years teaching experience of CBSE / State Board) |

EXCELLENT ENGLISH COMMUNICATION, COMPUTER, AI SKILLS ARE MANDATORY

UNIVERSITY STUDENTS ARE HIGHLY ENCOURAGED TO APPLY!

INTERESTED CANDIDATES CAN CONTACT US

9822304638 shewaletrust@gmail.com dr.rahulshewale@gmail.com



**पाहिजेत**

नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स

वेल्हाळे, ता. संगमनेर

पंचकर्म थेरापिस्ट

पुरूष–१/ स्त्री –१

आकर्षक पगार

9370071777

8806292948



**पाहिजेत**

दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा

आकर्षक पगार

राजा ड्रेसेस

बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर

8275191096


## हजारवाडीत गणेश विसर्जन मिरवणुकीत भक्तीचा जल्लोष



युवावार्ता (प्रतिनिधी)

हजारवाडी - श्री गणेश तरुण मित्र मंडळ, कोळेकर वस्ती, हजारवाडी ता. संगमनेर यांच्या वतीने गणेश विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी गणरायाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात व गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात परिसर भक्तिमय झाला होता.

विसर्जन मिरवणुकीत परिसरातील मोठ्या संख्येने गणेशभक्त सहभागी झाले होते. महिला, युवक तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पुढच्या वर्षी लवकर या सांगत गणरायाला निरोप दिला. विसर्जन सोहळ्यानंतर मंडळाच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या महाप्रसादाचा अनेक गणेशभक्त व ग्रामस्थांनी लाभ घेतला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन सुरळीतपणे पार पाडले.


**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**

अकाऊंटंट मॅनेजर

अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य

Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक

टिम हाताळण्याची क्षमता असावी

पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)

इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा

पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर

- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084









**पाहिजेत**

रिषभ गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड

सल्समन - २

ड्रायव्हर - १

वॉचमेन - १

ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर

9604334777

8669888777



**पाहिजेत**

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४

अकाऊंटंट - २

सेल्समन - ५

(इन्सेंटीव्ह दिला जाईल)

आकर्षक पगार दिले जाईल

9822097904

9404971697

भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)



**भाड्याने देणे आहे**

सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे

सुकेवाडी रोड, संगमनेर

8282825818



**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५

सफाई कर्मचारी - ५

हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

# संगमनेरचा दुष्काळग्रस्त तालुक्यात समावेश - आ. खताळ

## शेतकऱ्यांच्या व्यथा मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचविल्या



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संपूर्ण राज्यात पावसाने ओढ दिली त्यामुळे खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला असू शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. दुष्काळात होरपळत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा आमदार अमोल खताळ पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर मांडल्या होत्या. राज्य शासनाने राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले असून, त्यामध्ये संगमनेर तालुक्याचाही समावेश करण्यात आला आहे . त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना आता दुष्काळी सवलतींचा लाभ मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री, कृषिमंत्री आणि पालकमंत्र्यांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली. शनिवारी दुपारी आमदार खताळ यांनी त्यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले की, चालू वर्षी संगमनेर तालुक्यात पावसात मोठा खंड पडल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. खरीप पिकांची परिस्थिती हाताबाहेर गेली असून, अनेक शेतकऱ्यांची पिके पावसाअभावी वाळून गेली आहेत. त्यामुळे तालुक्यातील खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आपण मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांच्यासमोर मांडून तालुका लवकरात लवकर दुष्काळग्रस्त जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली होती.

दोन दिवसांपूर्वी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे संगमनेर तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी पिंपळे येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची पाहणी केली. त्यावेळी आपण त्यांच्यासमोर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य मांडून संगमनेर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी केली होती. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचीही भेट घेऊन शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या होत्या.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषिमंत्री, पालकमंत्री तसेच महायुतीच्या विविध मंत्री आणि आमदारांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली. या सर्व प्रयत्नांमुळे राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून, त्यात संगमनेर तालुक्याचाही समावेश झाला आहे. आता तालुक्यात दुष्काळाचे निकष लागू होणार असून, नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे केले जाणार आहेत. मात्र, शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी सरसकट पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे खताळ यांनी सांगितले. जलसंधारणाच्या कामांचे महत्त्व अधोरेखित करताना आमदार खताळ म्हणाले की, अतिवृष्टी असो किंवा दुष्काळ, जलसंधारणाची कामे केल्यास त्याचा निश्चितच फायदा होतो. त्यामुळे दुष्काळ व्यवस्थापनाच्या कक्षेत तालुक्याचा समावेश झाल्याने शेतकऱ्यांना विविध सवलतींचा लाभ मिळणार आहे. आगामी काळातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी जे काही शक्य आहे, ते करण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे.

मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडले होते, तर यंदा पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर पुन्हा संकट ओढवले आहे. निसर्गातील बदलांमुळे अशा परिस्थिती निर्माण होत आहेत. मात्र, महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याने त्यांनी चिंता करू नये, असे आवाहनही आमदार खताळ यांनी केले. दुष्काळग्रस्त भागांमध्ये मुलींच्या लग्नाचा प्रश्न निर्माण झाल्यास शिवसेनेच्या वतीने त्यांच्या लग्नाची जबाबदारी घेतली जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले असल्याची माहितीही आमदार खताळ यांनी यावेळी दिली.

# अध्यक्षांसह कोतूळ संस्थेचे सात संचालक अपात्र

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील कोतूळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सात विद्यमान संचालकांवर कर्ज थकबाकीच्या कारणावरून अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. सहकारी संस्थांचे सहायक निबंधक अमोल वाघमारे यांनी शुक्रवारी याबाबत आदेश जारी केला. या कारवाईत संस्थेचे विद्यमान अध्यक्ष विशाल नामदेव गोडे तसेच माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक रघुनाथ गेनू जाधव यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र सहकारी अधिनियमानुसार संबंधित संचालक कर्जाच्या थकबाकीमुळे समिती सदस्य संस्था अथवा संचालक म्हणून पदावर राहण्यास अपात्र ठरत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. कारवाई झालेल्या संचालकांमध्ये विशाल नामदेव गोडे (६२,५००), रघुनाथ गेनू जाधव (७५,०००), संदीप रघुनाथ लेंभे (१ लाख), बाळासाहेब लक्ष्मण लेंभे (१ लाख २१ हजार ७०१), भागा गंगाराम शेळके (२५,०००), उषा नामदेव गोडे (२ लाख २५ हजार) आणि सुगंधाबाई नामदेव बांबळे (१ लाख १२ हजार ५००) यांचा समावेश आहे.

सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी बी. जे. देशमुख व अन्य दोघांनी सहाय्यक निबंधकांकडे याबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. संबंधित संचालकांवर कायद्यानुसार कारवाई करून त्यांचे समिती सदस्यपद रद्द करण्याची मागणी तक्रार अर्जात करण्यात आली होती. या प्रकरणाची ३० जुलै, १८ ऑगस्ट आणि ३ सप्टेंबर २०२६ रोजी सुनावणी झाली. संबंधित समिती सदस्यांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. सुनावणीदरम्यान मांडण्यात आलेली बाजू, उपलब्ध कागदपत्रे व वस्तुस्थिती तसेच कायद्यातील संबंधित तरतुदींचा विचार केल्यानंतर सहायक निबंधक वाघमारे यांनी सात संचालकांविरोधात अपात्रतेचा आदेश जारी केला.

# शेतातील किरकोळ वादाचे गंभीर प्रकरणात रूपांतर- १२ जणांवर गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शेतात टोमॅटो तोडण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर गंभीर हाणामारी, विनयभंग आणि दंगलीत झाल्याची घटना संगमनेर तालुक्यातील खंडेरायवाडी (पिंपळगाव देवा) येथे घडली आहे. गुरुवारी (२४ सप्टेंबर) घडलेल्या या घटनेप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात १२ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, पोक्सो, अ‍ॅट्रॉसिटी आणि शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी शेतात काम करत असताना आरोपी कानिफनाथ वाळूंज याने महिलांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली. या प्रकाराबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या तक्रारदार महिलेचा विनयभंग करण्यात आला तसेच तिच्या १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा हात धरून तिला अश्लील भाषेचा वापर करत धमकी देण्यात आली. आरोपींनी तक्रारदार महिलेच्या गळ्यातील सुमारे ३५,००० रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून नेले.

यानंतर हा वाद मिटवण्यासाठी गेलेल्या नातेवाईकांना आरोपींनी आणि त्यांच्या साथीदारांनी मारुती मंदिराच्या आत डांबून ठेवले. तलवार, हॉकीस्टिक, लोखंडी गज आणि दगडांनी बेदम मारहाण करून काहींना गंभीर जखमी केले. पीडितांच्या खिशातील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेण्यात आली आणि त्यांच्या दुचाकींचेही मोठे नुकसान करण्यात आले.

या प्रकरणी उषा शरद पवार (वय ३५, रा. अंभोरे) यांच्या फिर्यादीवरून घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी धनंजय वाळूज, प्रतिक वाळूज, अभिषेक वाळूज, शैलेश बोऱ्हाडे, विदेश ढेरंगे, भानुदास वाळूज, बाळू उंडे, संजय ढेरंगे, निलेश ढेरंगे, जिवन वाळूज, गणेश ढेरंगे आणि सतीश वाळूज यांच्याविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपअधीक्षक कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

# साहित्यामधून जीवनाला संस्कार व समृद्धता मिळते - डॉ. कळमकर




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर शहर व तालुका ही सांस्कृतिक व वैचारिक अशी समृद्ध भूमी आहे. नवी पिढी ही अधिक समृद्ध होणे गरजेचे आहे. मात्र सध्या मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम जास्त असल्याने विद्यार्थ्यांऐवजी पालकांना संस्कार देण्याची गरज आहे. जीवनाचा पाया अधिक समृद्ध करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल कमी वापरून पुस्तकाशी मैत्री करावी असा सल्ला ज्येष्ठ साहित्यिक व वक्ते डॉ. संजय कळमकर यांनी विद्यार्थ्यांना दिला आहे. तर १०१ वे साहित्य संमेलन संगमनेर मध्ये आयोजित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सौ. दुर्गाताई तांबे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद,व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री लॉन्स येथे बालकुमार साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी संमेलन अध्यक्ष पदावरून ते बोलत होते. तर व्यासपीठावर स्वागत अध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे, उद्घाटक ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक डॉ. स्वाती महाळंक, कार्यवाह प्रसाद मिरासदार, श्रीमती सुवर्णाताई मालपाणी, डॉ. नितीन संगमनेरकर ,प्रा. बाबा खरात, संगमनेर शाखेचे अध्यक्ष अनिल देशपांडे, अनिल सोमणी, अरविंद गाडेकर, दर्शन जोशी, ओंकारनाथ बिहानी,अरुण लेले , डॉ .विवेक वाकचौरे, प्रा शशांक गंधे,चारुदत्त काटकर, प्रा. प्रकाश पारखे,प्राचार्य एस एम खेमनर, उपप्राचार्य सुरेखा दिघे, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

दीप प्रज्वलन करून या बालकुमार साहित्य संमेलन व पुस्तक जत्रेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना संमेलनाअध्यक्ष डॉ संजय कळमकर म्हणाले की, संगमनेरला मोठी साहित्यिक परंपरा लाभली आहे. ६४ कला असून त्यापैकी कोणतीतरी एक कला आपल्याला अवगत असते ती ओळखून त्यामध्ये तुम्हाला करिअर करता येते. सध्या मोबाईलचा अतिवापर वाढला असून त्याचे दुष्परिणाम जाणू लागले आहेत म्हणून खरे तर पालकांसाठी संस्कार शिबिर घेणे गरजेचे आहे.

मोबाईल मुळे संवाद होत नाही, गोष्टी बंद झाल्या. अन्न, वस्त्र ,निवारा ऐवजी मोबाईल डाटा इंटरनेट या मूलभूत गरजा झाल्या आहेत. आनंदी राहण्यासाठी मोबाईल टाळून पुस्तकांशी मैत्री करा. मोबाईलमुळे आळशीपणा, स्थूलता वाढत असून डोळे खराब होतात. झोप अधुरी राहते. तर पुस्तकांमधून आनंद मिळतो.

जुन्या काळी खरा आनंद होता शिक्षकांना विद्यार्थ्यांना मारण्याची मुभा होती विद्यार्थी घडले जायचे आजी आजोबा गोष्टी सांगायचे त्यामधून संस्कार मिळायचे वडीलधाऱ्यांचा सन्मान केला जायचा आज मात्र टीव्ही आणि मोबाईलच्या जमान्यामध्ये कुटुंब व्यवस्था अडचणीत आली आहे. गरिबी होती म्हणून फाटके कपडे असायचे ते स्वच्छ धुऊन, शिवून घातले जायचे त्यामध्ये आनंद होता आता मात्र श्रीमंती आली आणि महागडे कपडे फाडले जातात ही कुठली फॅशन अशी खंत ही त्यांनी व्यक्त केली. तर संमेलन स्वागत अध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, पाच नद्यांचा संगम संगमनेरला झाला असून कवी अनंत फंदी यांच्यापासून विचारवंतांची आणि साहित्यिकांची मोठी परंपरा लाभली आहे. अनेक नामवंत साहित्यिक कवी लेखक आज संगमनेरचे नाव साहित्य विश्वातून महाराष्ट्रापुढे आणत आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ.सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर मध्ये सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन होत असते. २०१० मध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये विजया वाढ व मंगेश पाडगावकर उपस्थित होते. साहित्यामधून संस्कार आणि संस्कृतीचे शिक्षण मिळते. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृत मंथन व अमृत गाथा ही पुस्तके लिहिली त्याबद्दल तालुक्याचा व सहकाराचा इतिहास उभा राहतो. हे साहित्य संमेलन जिल्ह्यामध्ये संगमनेर मध्ये होत असल्याचा अभिमान असून यासाठी संगमनेर साहित्य परिषदेच्या अध्यक्ष अनिल देशपांडे व सर्व सदस्यांनी मोठे परिश्रम घेतले. शंभरावे साहित्य संमेलन पुण्यामध्ये होत असून १०१ वे.साहित्य संमेलन संगमनेर मध्ये घेण्यासाठी आपला प्रयत्न असल्याचा त्या म्हणाल्या.

तर डॉ. स्वाती महाळंक म्हणाल्या की, शंभरावे साहित्य संमेलन हे पुण्यामध्ये होत आहे साहित्य संमेलनाची शंभरी होणे हे महाराष्ट्रासाठी अत्यंत आनंदी असून राज्यभरात ९९ नांदी साहित्य संमेलन घेतली जात आहे विद्यार्थ्यांनी स्वतःची एक गोष्ट लिहावी असे सांगताना वाचनाने व ऐकण्याने मन समृद्ध होते असे त्या म्हणाल्या.


## नोकरीची सुवर्णसंधी

**'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'**

**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

**पदे: Field Sales Executive**
**Business Development Manager**

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**

* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**

आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165
















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# जिल्हा बँकेच्या निमित्ताने ‘समझोता एक्सप्रेस’!

## बिनविरोध निवडणुकीसाठी संगमनेरमधून राजकीय जुळवाजुळव सुरू

### कट्टर राजकीय विरोधक एकाच व्यासपीठावर



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीचा बिगुल वाजला असतानाच जिल्ह्याच्या राजकारणात मात्र अनपेक्षितपणे ‘समझोता एक्स्प्रेस’ धावू लागली आहे. एकमेकांचे पारंपरिक राजकीय विरोधक म्हणून ओळखले जाणारे विविध पक्षांचे नेते रविवारी संगमनेरमध्ये एकाच व्यासपीठावर आले आणि जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात बदलत्या समीकरणांची नवी नांदी झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालक पदांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून, सोमवार (२८ सप्टेंबर)पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. ५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून, ६ ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल. ७ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. २ नोव्हेंबरला मतदान, तर ३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

मात्र, मतदानाचा दिवस जवळ येण्यापूर्वीच राजकीय हालचालींना वेगळे वळण मिळाले आहे. दुष्काळाचे सावट, शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट आणि सहकार क्षेत्रातील आव्हाने लक्षात घेता बँकेची निवडणूक टाळून ती बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांनी पुढाकार घेतला आहे. या प्रयत्नांची पहिली ठोस पायरी संगमनेरमध्ये झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत पडली.

थोरातांकडे समन्वयाची धुरा? - संगमनेर येथे झालेल्या बैठकीत बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याबाबत प्राथमिक सहमतीचे वातावरण निर्माण झाले. या प्रक्रियेत समन्वयाची जबाबदारी ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर सोपविण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील विविध राजकीय गटांना एकत्र आणण्याच्या प्रक्रियेला आता वेग येण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, या बैठकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप तसेच इतर राजकीय प्रवाहांतील प्रमुख नेते एकत्र आले. माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, संग्राम जगताप, हेमंत ओगले, विवेक कोल्हे, विक्रम पाचपुते, प्राजक्त तनपुरे, काशिनाथ दाते, अक्षय कर्डिले यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. आमदार मोनिका राजळे आणि जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले यांनी ऑनलाइन उपस्थित राहून या भूमिकेला पाठिंबा दिला.

मागील निवडणुकीत उत्तर भागातून आशुतोष काळे, अमित भांगरे, करण ससाणे आणि गणपतराव सांगळे, तर दक्षिण भागातून अनुराधा नागवडे, आशा तापकीर आणि प्रशांत गायकवाड यांना संधी मिळाली होती. यंदा कोणत्या गटाच्या समर्थकांना संधी मिळणार, यावरून पुढील राजकीय समीकरणे निश्चित होणार आहेत.

संगमनेरमधील बैठकीने बिनविरोध निवडणुकीच्या दिशेने पहिली पायरी टाकली असली, तरी अंतिम फॉर्म्युला ठरविणे ही मोठी कसोटी असणार आहे. प्रत्येक तालुक्यातील इच्छुकांची संख्या, मतदारसंघनिहाय प्रतिनिधित्व, पक्षीय समीकरणे आणि स्थानिक राजकीय संघर्ष यांचा ताळमेळ साधावा लागणार आहे.

त्यामुळे आता तालुकानिहाय बैठकांना महत्त्व प्राप्त झाले आहे. अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्याने इच्छुकांची भूमिका स्पष्ट होईल आणि त्यानंतर माघारीच्या काळात बिनविरोधसाठीच्या हालचालींना निर्णायक वेग येण्याची शक्यता आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याची भूमिका पुढे आल्याने जिल्ह्याच्या राजकारणात त्याचे व्यापक पडसाद उमटण्याची शक्यता आहे. वर्षानुवर्षे परस्परांविरोधात राजकीय लढाया लढणारे नेते सहकार क्षेत्राच्या मुद्द्यावर एकाच व्यासपीठावर आल्याने आगामी काळातील राजकीय समीकरणांबाबतही चर्चेला उधाण आले आहे.

मात्र, ही एकजूट केवळ जिल्हा बँकेपुरती मर्यादित राहणार की त्यातून जिल्ह्याच्या राजकारणातील नवी समीकरणे आकाराला येणार, हे आगामी काळात स्पष्ट होईल. सध्या तरी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत ‘दोस्तीतील कुस्ती’ टाळण्यासाठी सुरू झालेल्या या समझोता एक्स्प्रेसकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

तालुकानिहाय जागावाटप आणि इच्छुकांची मनधरणी करण्याची असून, २१ पैकी किती जागा बिनविरोध होतात, यावर या राजकीय समझोत्याचे यश अवलंबून राहणार आहे.

### राजकीय मतभेद बाजूला सहकारासाठी एकत्र येण्याचा प्रयत्न

**जिल्हा बँक ही शेतकरी, सहकारी संस्था, ठेवीदार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट जोडलेली संस्था आहे. त्यामुळे निवडणुकीतील राजकीय संघर्षामुळे बँकेच्या कामकाजावर परिणाम होऊ नये, तसेच दुष्काळी परिस्थितीत कोट्यवधींचा निवडणूक खर्च टाळावा, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. जिल्हा बँकेची निवडणूक यापूर्वीही अनेकदा बिनविरोध करण्याची परंपरा राहिली आहे. मागील पंचवार्षिक निवडणुकीत २१ पैकी तब्बल १७ जागा बिनविरोध झाल्या होत्या. केवळ चार जागांवर निवडणुकीची चुरस झाली होती. यंदाही त्याच धर्तीवर सहमतीचा फॉर्म्युला राबविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.**

### सात जागांवर सहमतीचा फॉर्म्युला?

**महिला राखीव दोन, शेतीपूरक व बिगरशेती मतदारसंघातील प्रत्येकी एक, ओबीसी आणि एनटी प्रत्येकी एक तसेच अनुसूचित जाती-जमातीची एक, अशा सात जागांवर सहमतीचा फॉर्म्युला निश्चित करण्याबाबत चर्चा झाली आहे. या सातपैकी चार जागा उत्तर नगर, तर तीन जागा दक्षिण नगर जिल्ह्याच्या वाट्याला येण्याची शक्यता असल्याची चर्चा सहकार क्षेत्रात आहे.**

## परवानगी नाकारली, आता जेलभरो, सीजेपीचा इशारा

मुंबई - मुंबई पोलिसांनी कॉकरोच जनता पार्टीच्या २ ऑक्टोबर रोजी शिवाजी पार्क येथे होणाऱ्या आंदोलनाला परवानगी दिली नाही. हे आंदोलन निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात होणार होते. पोलिसांनी उच्च न्यायालयाचे निर्देश, बीएमसीची परवानगी नसणे आणि वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता यांचा हवाला दिला. पोलिसांनी असेही सांगितले की, शिवाजी पार्क शांतता क्षेत्रात येते आणि त्याच्या आसपास निवासी परिसर आहेत. आंदोलनामुळे वाहतूक कोंडी होण्याची तसेच आसपासच्या रुग्णालयांपर्यंत आपत्कालीन वाहनांची ये-जा प्रभावित होण्याची शक्यता आहे. आयोजकांना मुंबईतील अन्य ठिकाणाचा पर्याय शोधण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दरम्यान, सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके म्हणाले- नागरिकांचा आवाज दाबण्याचे असे प्रयत्न स्वीकारार्ह नाहीत. आम्हाला आंदोलन करण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवले गेले, तर उगझ गांधी जयंतीच्या दिवशी मुंबईत जेल भरो आंदोलन सुरू करेल.

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात महाभियोगाची तयारी, ‘इंडिया’ आघाडीची दिल्लीत बैठक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात संसदेत पदच्युतीचा प्रस्ताव आणण्याच्या तयारीत ‘इंडिया’ आघाडीतील विरोधी पक्ष आहेत. यासंदर्भात पुढील रणनीती ठरविण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब येथे आघाडीची महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत खासदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्याची मोहीम सुरू करण्याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेवरून निवडणूक आयोगातील कथित मतभेद समोर आल्याच्या वृत्तानंतर विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. द इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, उर्वरित दोन निवडणूक आयुक्तांनी गेल्या दहा महिन्यांत एसआयआर प्रक्रियेतील विविध मुद्द्यांवर १४ वेळा आक्षेप नोंदविल्याचे सांगण्यात आले.



दरम्यान, ममता बॅनर्जी, राहुल गांधी आणि माकपचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा झाल्यानंतर ३० सप्टेंबरची बैठक निश्चित करण्यात आल्याचे वृत्त आहे. या बैठकीत पदच्युतीचा प्रस्ताव, ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी, निवडणूक आयोगाच्या निर्णयांची चौकशी आणि आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आंदोलनाची रणनीती यावर चर्चा होण्याची शक्यता आहे. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यासह आघाडीतील प्रमुख नेते बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मात्र, डीएमकेच्या सहभागाबाबत अद्याप स्पष्टता नाही. विरोधकांच्या आरोपांवर भाजपने टीका केली असून, निवडणूक आयोगाने संस्थात्मक चर्चेत वेगवेगळी मते असणे स्वाभाविक असल्याचे स्पष्ट केले आहे. आयोगातील सर्व निर्णय वैधानिक प्रक्रियेनुसार आणि तिन्ही आयुक्तांच्या सर्वसंमतीने घेतल्याचे आयोगाने म्हटले आहे.

## बँक कर्मचाऱ्यांचा तीन दिवसांचा संप स्थगित

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशभरातील बँक कर्मचाऱ्यांनी २८ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत पुकारलेला तीन दिवसांचा संप ऐनवेळी स्थगित करण्यात आला आहे. संपाच्या पूर्वसंध्येला इंडियन बँक्स असोसिएशन (खइ-) आणि युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स (णऋइण) यांच्यात झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

बँक कर्मचाऱ्यांची पाच दिवसांचा कामाचा आठवडा, पेन्शन लाभात सुधारणा, सर्व पेन्शनधारकांना समान महागाई भत्ता आणि एनपीएसधारक कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेत परतण्याचा पर्याय यांसह विविध मागण्या आहेत.

संप स्थगित झाल्याने बँक ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रस्तावित संपामुळे चेक क्लिअरन्स, रोख व्यवहार आणि अन्य बँकिंग सेवांवर परिणाम होण्याची शक्यता होती. मात्र, संप स्थगित करण्यामागे नेमका काय तोडगा निघाला, याबाबतची सविस्तर माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त!
चक्क FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
गणेशोत्सव निमित्त सर्व गणेश भक्तांना हार्दिक शुभेच्छा!
चांदीच्या दागिण्यांच्या मजुरीवर १००% सूट
सोने च्या दागिण्यांची मजुरीवर फक्त ७%
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
मो. ७५९९९९६९९९ /८२६५०३६८०७

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा